महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,
( नविन इमारत ), देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद
Website :- www.jdheaur.org/ E-mail:- jdheaur_2007@rediffmail.com
फोन नंबर .2331913 एस.टी.डी.कोड 0240 फॅक्स नंबर 2331913

जा.क्र. शिससं/उशि/औवि/अनुदान-३/ २०१२/५०८ दिनांक :- २६-११-२०१२. ५-२-१३

**प्रति,**
**प्राचार्य,**
**कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**शिरुर कासार, जि बीड**

**विषयः- सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षाच्या कार्यभाराबाबत.**

सदर्भः- आपले पत्र क्रमांक निरंक दिनांक १६-१०-२०१२.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, आपण संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास सादर केलेल्या आपल्या महाविद्यालयाचे सन २०१२-२०१३ या वर्षाचे दिनांक १ ऑक्टोबर २०१२ रोजीच्या अनुदानित विद्यार्थी संख्येच्या बरोबर असल्या बाबत आपण प्रमाणित केले आहे. त्याआधारे आपल्या महाविदयालयाचा विषयनिहाय /विद्याशाखानिहाय कार्यभार तपासणी करुन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून तसेच शासन निर्णय दिनांक ११.१२.१९९९ अन्वये विहित केलेल्या कार्यभाराच्या मानकानुसार खालील अटीच्या अधिन राहून शिक्षक / शिक्षकेतर पदे सोबत दिलेल्या तक्त्याप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

१. दिनांक १ ऑक्टोंबर ची अनुदानित विद्यार्थी संख्या जी एमकेसीएल यांनी प्रमाणित करुन दिली आहे व जी आपण बरोबर असल्या बाबत खात्री प्रमाणित करुन दिलेली आहे ती अनुदानित विद्यार्थी संख्या महाविद्यालयाच्या हजेरी पटावर असणे बंधनकारक राहील .
२. व्याख्याने /प्रात्यक्षिके या साठी दाखविलेल्या तासिका शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विद्यापीठाने विहीत केलेल्या अभ्यासक्रमानुसार असणे आवश्यक आहे. तसेच ज्या अतिरिक्त पेपर यास अनुदानास ग्राहय धरण्या बाबत शासनाने वित्तीय मान्यता दिलेली नाही त्या अतिरिक्त पेपरचा कार्यभारात समावेश करण्यात येऊ नये.
३. विषयनिहाय दाखविलेल्या विहित तासिका प्रत्यक्षात वेळापत्रकात असणे आवश्यक आहे. व वेळापत्रकाची प्रमाणित प्रत कार्यभाराबरोबर जोडणे आवश्ययक आहे
४. सदरहू कार्यभार मान्यता आपल्या महाविद्यालयातील विद्याशाखा / तुकडया / विषय अनुदानित विद्यार्थी संख्या विचारात घेऊन मान्य करण्यात येत आहे.
६. प्रथम, द्वितीय, तृतीय या वर्षात विद्याशाखा / विषय/ तुकडया यासाठी शासनाने विद्यार्थी संख्येचे निकष लावलेले आहेत व त्या आधारे आपण कार्यभाराची परिगणना केलेली आहे व ती बरोबर असल्या बाबत आपण प्रमाणित केलेले आहे या अटीच्या अधिन राहून कार्यभार मान्यता देण्यात येत आहे

७. आपल्या महाविद्यालयास /विद्याशाखेस/तुंकडयास व विषयास शासनाने मान्यता / अनुदान मंजूर केल्या बाबत आपण प्रमाणित केले आहे यास जर तफावत आढल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयावर राहील

८. या कार्यालयाने मंजूर करुन दिलेल्या कार्यभाराप्रमाणे अनूज्ञेय शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांची वेतन अदा करण्यात यावे . जे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-याची नव्याने नेमणूक झाली आहे त्यांची प्रथम या कार्यालयाकडून मान्यता घेऊनच वेतन देयकात नाव समाविष्ठ करण्यात यावे.

९. वेतन अनुदान निर्धारणाच्या वेळी वरील अटींचे आपणाकडून पूर्तता न केल्याचे आढळून आल्यास सदरील पदावरील अनुदानवरील झालेला खर्च अमान्य करण्यात येईल.

१०. शासन निर्णयानुसार आपल्या महाविद्यालयाचे बिंदू नामावली मावक कक्ष विभागीय आयूक्त कार्यालय औरंगाबाद यांच्या कडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे ती तात्काळ करुन घेण्यात यावी.

११. प्रत्येक विषयास दर वर्षी प्रथम वर्गास शहरीभागात असलेल्या महाविद्यालयातील विषयास २४ व ग्रामीण भागातील महाविद्यालये, माहिला महाविद्यालये, अधिवासी भागात असलेल्या महाविद्यालयांसाठी प्रथम वर्षी विषयास १० विद्यार्थी संख्या असणे आवश्यक आहे.

१२. शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-यांची कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेली पदे शासनाच्या पुर्व मंजूरी शिवाय भरु नये तसा प्रस्ताव संपुर्ण माहितीस्तव (जसे आरक्षण / पद रिक्त होण्याची कारणे / तारीख) या कार्यालयामार्फत शासनास पाठवावा लागेल. तरी प्रस्ताव सर्व माहितीसह तीन प्रतीत सादर करावा.

१३. शासन निर्णय क्रमांक बीजीटी /१०००/प्र.क्र.१३/२०००/अर्थ संकल्प-१९/दिनांक २९ जून २००० नुसार नवीन निर्माण होणारी पदे शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत भरता येणार नाही तसा स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेकरिता या कार्यालयामार्फत शासन मान्यतेसाठी सादर करावा.

१४. शासन निर्णय असंक-१००१/प्र.क्र२९/२००१/वित्तीय सुधारणा/दिांक १० सप्टेंबर २००१ अन्वये पुर्वीच्या मान्य पदांपेक्षा कार्यभार वाढल्यामुळे नविन पदे निर्माण होत असल्यास सदरील पदांना (पदाच्या आढाव्यात) शासनाची मान्यता मिळाल्यानंतर या कार्यालयाकडून / संचालनालयाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेऊन नियमानुसार पदे भरण्यासंबधी कार्यवाही करावी . सदरची नवनिर्मित पदे शासन मान्यतेशिवाय भरल्यास त्या पदांचा खर्च अनुदानास पात्र होणार नाही.

१५. शासन निर्णय संकिर्ण -१००२/६९८/२००२/आस्था-१ दि.११.९.२००३ व संचालनालयाचे पत्र क्रमांक एनजीसी -२००६/अपंग अनुशेष/मवि-१ दिनांक ३०.९.२००६ अन्वये अपंग अनुशेष भरणे आवश्यक राहिल .

सहसंचालक,
(उच्चशिक्षण)
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

kalikadevi college

महाविद्यालयाचे नांव :- **कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरुर कासार जि बीड**

विषय :- **सन (२०१२-२०१३ ) चे कर्मचारी ( शिक्षक /शिक्षकेत्तर ) संस्था निर्धारणाबाबत**

| अ.क्र. | विषय | माहिती |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नांव | कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.) ता. शिरूर (का.) जि. बीड |
| २ | स्थापना वर्ष | शै. वर्ष २००२ |
| ३ | संचालक संस्थेचे नांव | आदर्श शिक्षण संस्था बीड. ता. जि. बीड |
| ४ | विद्यापीठाचे चालू वर्षाचे संलग्नीकरणाच्या पत्राचा क्रमांक व दिनांक | SCAD/PER.AFFIL./SRR/२०१२-२०१३/१७९६२-६८ दि. २५/०७/२०१२ |
| ५ | कनिष्ठ महाविद्यालय १०० टक्के अनुदानावर आल्याचे वर्ष व शासन आदेश क्रमांक व दिनांक | कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महा.शी संलग्न नाही. |
| ६ | वरिष्ठ महाविद्यालय १०० टक्के अनुदानावर आल्याचे वर्ष शासन आदेश क्रमांक व दिनांक | कला शाखा - क्रमांक एनजीसी/००८/ ४४५०४/औवि/मवि-२/१०८१६, दिनांक २७.०१.२००९. |
| ७ | नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या वर्ष, टक्केवारी व आदेश क्रमांक व दिनांक ( विद्याशाखा तुकडया, विषयासह ) | वाणिज्य व विज्ञान शाखा अनु. १००% शासन अद. क्: एनजीसी/२००९/(२२५/०९)/मशि ३ मंत्रालय विस्तार भुवन मुंबई ४०००३२ दि. ०७ नोव्हेंबर २००९ |
| ८ | प्राचार्यांचे नाव व विषय | डॉ. हनुमंत रणखांब |
| | प्राचार्यांचा दुरध्वनी क्रमांक | (०२४४४) २५९५९० मो. ९८२२४१५२१० |
| ९ | महाविद्यालयाचा दुरध्वनी क्रमांक | (०२४४४) २५९५९० |
| ९ | कार्यभार निर्धारण वर्ष | **२०१२-१३** |

**विद्याशाखा निहाय अनुदानित तुकडी व त्यातील विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | विद्याशाखा निहाय वर्ग | वर्ष २०१२-२०१३ | |
|---|---|---|---|
| | | तुकडया | विद्यार्थी संख्या |
| १ | **कला शाखा** | | |
| | ११वी | - | - |
| | १२ वी | - | - |
| | बी.ए. प्रथम वर्ष | १ | १२० |
| | बी.ए.व्दितीय वर्ष | १ | ११६ |
| | बी.ए.तृतिय वर्ष | १ | ११० |
| | **एकुण** | **३** | **३४६** |
| २ | **वाणिज्य शाखा** | | |
| | ११वी | -- | -- |
| | १२ वी | -- | -- |
| | बी.कॉम प्रथम वर्ष | १ | ७३ |
| | बी.कॉम व्दितीय वर्ष | १ | ४३ |
| | बी.कॉम तृतीय वर्ष | १ | ३४ |
| | **एकुण** | **३** | **१५०** |
| ३ | **विज्ञान शाखा** | | |
| | ११वी | - | |
| | १२ वी | - | |
| | बी.एस्सी . प्रथम वर्ष | १ | १२० |

| | | | |
|---|---|---|---|
| | बी.एस्सी व्दितीय वर्ष | १ | ९४ |
| | बी.एस्सी तृतीय वर्ष | १ | ८५ |
| | **एकुण** | **३** | **२९९** |
| ४ | **अ.क्र १,२ व ३ ची बेरीज** | **९** | **७९५** |

| अ.क्र. | विद्याशाखा निहाय वर्ग | वर्ष २०१२-२०१३ | |
|---|---|---|---|
| ५ | पदव्युत्तर विभाग अनुदानित ( १०० टक्के अनुदानावर आल्याचे वर्ष आदेश क्रमांक व दिनांक ) | -- | -- |
| | प्रथम वर्ष अनुदानित विद्यार्थी संख्या | -- | -- |
| | व्दितीय वर्ष अनुदानित विद्यार्थी संख्या | -- | -- |
| | **एकुण** | **--** | **--** |

**वर्गवार कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्यूतर अनुदानित विद्यार्थी संख्या खालील प्रमाने आहे.**

| अ.क्र | तपशील | अनुदानित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालयाची एकूण अनुदानित संख्या | -- |
| २ | वरिष्ठ महाविद्यालयाची एकूण अनुदानित संख्या | ७९५ |
| ३ | पदव्यूत्तर एकूण अनुदानित संख्या | -- |
| | **अनुदानित एकूण संख्या** | **७९५** |
| २ | विज्ञान शाखा अनुदानित असल्यास त्यातील विद्यार्थी संख्या | **२९९** |

सहसंचालक,
(उच्चशिक्षण)
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

महाविद्यालयाचे नांव :- **कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरुर कासार जि बीड**
सन२०१२-२०१३ वर्षाकरिता अनुदानित तुकडयातील विद्यार्थी संख्या विचारात घेता खालील प्रमाणे शिक्षक अनुज्ञेय राहतील.

**अ)शिक्षक कर्मचारी**

| अ. क्र. | विषय | कार्य भार | अनु ज्ञेय पदे | भरलेली पदे | | | रिक्त पदे (जागा) | | पद रिक्त होण्याची कारणे | अति रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमीत /तदर्थ A | कंत्राटी पध्दती B | A+B | पूर्ण वेळ | तासिका तत्वावर शिल्लक कार्यभार | | | |
| १ | प्राचार्य (हिंदी ) | ०६ | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | |
| २ | शा. नि . निदेर्शक | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ग्रंथपाल | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | |
| **अ** | **एकूण पदे** | **--** | **०३** | **०३** | **--** | **०३** | **--** | **--** | **--** | **--** | |
| **ब** | **कला शाखा** | | | | | | | | | | |
| १ | इंग्रजी (वाड.मय) | ५८ | ०३ | ०२ | -- | ०२ | ०१ | -- | -- | -- | |
| २ | मराठी व वाडमय | ४० | ०२ | ०२ | -- | ०२ | - | -- | -- | -- | |
| ३ | हिंदी व वाडमय | ३६-६ / ३० | ०२ | ०२ | -- | ०२ | - | -- | -- | -- | |
| ४ | इतिहास | २८ | ०१ | ०१ | -- | ०१ | - | १० तासिका | -- | -- | |
| ५ | राज्यशास्त्र | २८ | ०१ | ०१ | -- | ०१ | - | १० तासिका | -- | -- | |
| ६ | समाजशास्त्र | २८ | ०१ | ०१ | -- | ०१ | - | १० तासिका | -- | -- | |
| ७ | अर्थशास्त्र | २८ | ०१ | ०१ | -- | ०१ | - | १० तासिका | -- | -- | |
| ८ | लोकप्रशासन | २८ | ०१ | ०१ | -- | ०१ | - | १० तासिका | -- | -- | |
| ९ | भूगोल | ६६ | ०३ | ०३ | -- | ०३ | - | -- | -- | -- | |
| १० | गृहविज्ञान | ३० | ०२ | ०२ | -- | ०२ | - | - | -- | -- | |
| **क** | **विज्ञान शाखा** | | | | | | | | | | |
| १२ | रसायनशास्त्र | १२२ | ०६ | ०४ | -- | ०४ | ०२ | -- | ०१ नविन पद शासनमान्यतेशिवाय भरण्यात येऊ नये. | | |
| १३ | भौतिकशास्त्र | ५१ | ०३ | ०१ | -- | ०१ | ०२ | -- | -- | -- | |
| १४ | वनस्पतीशास्त्र | ५७ | ०३ | ०१ | -- | ०१ | ०२ | -- | -- | -- | |
| १५ | प्राणिशास्त्र | ५७ | ०३ | ०१ | -- | ०१ | ०२ | -- | -- | -- | |
| १६ | गणित | ४० | ०२ | -- | -- | - | ०२ | -- | -- | -- | |
| **ड** | **वाणिज्य शाखा** | | | | | | | | | | |
| १९ | वाणिज्य | ६४ | ०३ | ०३ | -- | ०३ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण शिक्षक पदे** | | **३७** | **२६** | **--** | **२६** | **११** | **--** | **--** | **--** | |
| **एकूण बेरीज** अ+ब+क+ड | | | ४० | २९ | -- | २९ | ११ | -- | -- | -- | |

सहसंचालक
(उच्चशिक्षण)
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

महाविद्यालयाचे नांव :- **कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरुर कासार जि बीड**
**अनुज्ञेय शिक्षकेतर पदे सन २०१२-२०१३**

| अ.क्र. | पदनाम | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे /शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रबंधक | -- | -- | -- | |
| २ | अधिक्षक | ०१ | ०१ | -- | |
| ३ | मुख्यलिपीक | ०१ | -- | ०१ | |
| ४ | कनिष्ठ लघुलेखक | -- | -- | -- | |
| ५ | सहा.ग्रंथपाल | -- | -- | -- | |
| ६ | वरिष्ठलिपीक | ०१ | ०१ | -- | |
| ७ | कनिष्ठ लिपीक | ०२ | ०२ | -- | |
| ८ | प्रयोगशाळा सहाय्यक | ०३ | ०२ | ०१ | नविन पद शासनमान्यते शिवाय भरण्यात येऊ नये. |
| ९ | ग्रंथालय लिपीक | -- | -- | -- | |
| **अ** | **एकूण वर्ग-३ कर्मचारी** | **०८** | **०६** | **०२** | |
| १० | ग्रथालय परिचर | ०३ | ०२ | ०१ | |
| ११ | प्रयोगशाळा पारिचर | ०७ | ०६ | ०१ | नविन पद शासनमान्यते शिवाय भरण्यात येऊ नये. |
| १२ | वर्ग -४ कर्मचारी शिपाई /सेवक | ०३ | ०२ | ०१ | |
| **ब** | **एकूण वर्ग-४ कर्मचारी** | **१३** | **१०** | **०३** | |
| **क** | **वर्ग-३ववर्ग-४एकूण कर्मचारी** | **२१** | **१६** | **०५** | **--** |

**टिपः-१) दिनांक १.१०.२०१२ ची प्रमाणित केलेली विद्यार्थी संख्या आकस्मित तपासण्यात येईल.**

१. शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-याची पदांची अनुज्ञेयता दिनांक १.१०.२०१२ रोजीची विद्यार्थी संख्या प्रमाणित केल्यानुसार आहे. प्रत्यक्ष अनुदान निर्धारणात विद्यार्थी संख्येत तफावत आढळल्यास त्या प्रमाणे पदाची अनुज्ञेयता बदलेल व या बाबत सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/संस्थेची राहील .

२. शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-याची वरील प्रमाणे अनुज्ञेय असलेली रिक्त पदे या कर्यालयाच्या तसेच मा.शिक्षण संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या पुर्व परवाागीशिवाय भरु नयेत अन्यथा यावर होणारा वेतनाचा खर्च मान्य होणार नाही.

३. शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-याची वरील पदे अनुदानित विद्या शाखा व तुकडयावर मान्य राहील.भविष्यात विनाअनुदानीत तत्वावरील विद्याशाखा /तुकडया असल्यास त्यावरील खर्च वेतासाठी मान्य होणार नाही

४. शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-याची संरक्षित प्रोटेक्टेड कर्मचारी सोडून इतर अतिरिक्त ठरणा-या पदाचा खर्च मान्य होणार नाही.

५. विद्यार्थी संख्या अभावी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचा-याचे समायोजन बंधनकारक राहील. रिक्त पदावर इतर महाविद्यालयातील शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचारी सामावून घ्यावे लागतील.

६. शासन निर्णय दिांक १०.संप्टेंबर २००१ नुसार वाढीव विद्यार्थी संख्यामुळे नविन निर्माण होणारी पदे असल्यास शासन मान्यता मिळाल्यां नंतरच या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेंऊन शासन नियमनुसार भरण्यात यावीत. अन्यथा त्या पदांवरील वेतन व भत्याचा खर्च अनुदानास पात्र धरला जाणार नाही.

सहसंचालक
(उच्चशिक्षण)
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.